THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 5TH APRIL 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २३ माहे फेब्रुआरी सन १८९४ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९४ चा आक्ट ४ था.

**कित्येक निरुपयोगी कायदे रद्द करण्याबाबदचा व दुसरे कित्येक कायदे सुधारण्याबाबदचा आक्ट.**

ज्याअर्थीं, ह्या आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांचा अमल होऊन गेल्यां कारणानें, किंवा ते स्पष्टपणें व नामनिर्देश करून रद्द करण्यांत न येतां इतर रीतीनें अमलांतून गेलेले असल्याकारणानें, किंवा कालांतरानें किंवा इतर प्रकारें त्यांची जरूरी राहिली नसल्याकारणानें, ते स्पष्टपणें व नामनिर्देश करून रद्द करणें इष्ट आहे;

आणि तसेंच ज्याअर्थीं ह्या आक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांत कांहीं किरकोळ सुधारणा करणें इष्ट आहे;

त्याअर्थीं पुढीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या कायद्यास, सन १८९४ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट, असें ह्मणावें. — सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या वहिवाटींतील सगळ्या मुलुकांस लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. (१) पहिल्या परिशिष्टांत सांगितलेले कायदे, त्याच्या चवथ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर, या कलमावरून रद्द केले आहेत. — परिशिष्टांमध्यें सांगितलेले कायदे अनुक्रमें रद्द व दुरुस्त करणें.

(२) दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांमध्यें, त्याच्या चवथ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर व त्या रीतीनें फेरफार केला आहे.

३. या आक्टावरून कोणताही कायदा रद्द केल्यामुळें, तो कायदा ज्या स्टाट्युटांत, आक्टांत किंवा कायद्यांत लागू केला असेल, सामील केला असेल किंवा ज्यांत त्याचा हवाला दिला असेल, त्यास बाध येतो असें समजूं नये; — कायम ठेवणें.

आणि जी कोणतीही गोष्ट अगोदर केली असेल किंवा करूं दिली असेल, तिचा कायदेशीरपणा, बेकायदेशीरपणा, परिणाम किंवा फळ यांस, किंवा अगोदर संपादन केलेला किंवा उत्पन्न झालेला कोणताही हक्क किंवा सत्ताधिकार किंवा उत्पन्न झालेली किंवा प्राप्त झालेली कोणतीही जबाबदारी किंवा पात्रता यांस, किंवा यांच्या संबंधानें केलेला कोणताही इलाज किंवा चालविलेलें कोणतेंही काम यांस, किंवा कोणतेंही कर्ज, गुन्हेगारी, जबाबदारी, पात्रता, दावा किंवा मागणी यांपासून मिळालेल्या कोणत्याही सुटकेस किंवा मोकाळिकीस, किंवा अगोदर दिलेल्या कोणत्याही हमीस, किंवा कोणत्याही मागील कृत्याच्या किंवा गोष्टीच्या पुराव्यास, ह्या आक्टावरून बाध येतो असें समजूं नये;

तसेंच, कायद्याचें कोणतेंही तत्व किंवा नियम, किंवा ठरलेली हुकुमत, जाबजबाब देण्याची [प्लीड करण्याची] पद्धत किंवा क्रम, वहिवाट किंवा काम चालविण्याची रीति, किंवा चालू रिवाज, चाल, सवलत, यत्ता, माफी, हुद्दा किंवा नेमणूक हीं, या आक्टानें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्यावरून, कायद्यांत किंवा कायद्यापासून कोणत्याही रीतीनें कायम केलीं असलीं, कबूल केलीं असलीं किंवा निष्पन्न झालीं असलीं तरी, त्यांना या आक्टावरून बाध येतो असें समजूं नये;

त्याचप्रमाणें, हल्लीं नसणारी किंवा अमलांत नसणारी कोणतीही हुकुमत, हुद्दा, चाल, पात्रता, हक्क, सत्ताधिकार, सवलत, यत्ता, माफी, रिवाज, वहिवाट, काम चालविण्याची रीति किंवा इतर बाबत किंवा गोष्ट, या आक्टावरून कोणताही कायदा रद्द झाल्यानें ठरते किंवा पुनः चालू होते असें समजूं नये.

---

## पहिलें परिशिष्ट.

### कायदे रद्द केले ते.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. |
| | | **भाग १.—मुंबई कोडांतील कायदे.** | |
| १८२७ | ९ | [ भाषांतर उपलब्ध नाहीं.] | [ ३ रें कोष्टक पाहा ] |
| " | १२ | पोलीस. | [ रद्द करावयाच्या मजकुराचें भाषांतर झालें नाहीं. ] |
| " | १३ | फौजदारी कोर्टें. | अंक [ पुरवण्या ] १, २, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३ व १४. |
| " | २० | जकात. | रद्द झालेला नसेल तेवढा. |
| " | २१ | अफू व पिण्याची दारू यांवर जकात. | रद्द झालेला नसेल तेवढा. |
| " | २९ | महाराष्ट्र व खानदेश. | २ ऱ्या कलमाच्या पहिल्या रकमेंतील, 'सन १८२७ चा अठरावा कायदा व स्टांपाचे बाबदींत जे दुसरे हुकुम लिहिले आहेत त्यांशिवाय,' हे शब्द व अंक. |
| १८३४ | १ | [ भाषांतर उपलब्ध नाहीं.] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |

## पहिलें परिशिष्ट—चालू.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. |
| | | **भाग २.—मुंबई शहर व ट.पू यांबाबदच्या कानू, आईन व कायदे.** | |
| १८२९ | २ | सन १८१२ ची कानू, आईन व कायदा १, हीं अंशतः रद्द करणें. | सगळा. |
| १८२७ | १ | सन १८१४ ची कानू, आईन व कायदा १, हीं अंशतः रद्द करणें. | सगळा. |
| १८२८ | १ | धक्क्यांवर माल राहूं देण्याची मनाई. | सगळा. |
| १८३४ | १ | सन १८२७ ची कानू, आईन व कायदा २, हीं अंशतः रद्द करणें. | रद्द झालेला नसेल तेवढा. |
| | | **भाग ३.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | |
| १८३६ | ७ | कित्येक कायद्यांवरून अधिकार असण्याबाबद. | रद्द झालेला नसेल तेवढा. |
| १८५२ | ११ | धारामाफीच्या इनामांवर धनीपणाचा हक्क. | कारणांतील, 'धनीपणाचे हक्काचा ठराव करण्याचे शिरस्त्यांप्रमाणें व मुंबई इलाख्याचे कायदे पुस्तकांतील सन १८२७ चे १७ वे कायद्याचे ९ वे व १० वे बाबेंत लिहिलेल्या शिरस्त्यांप्रमाणें व या बाबेचा पुरवण्याप्रमाणेंही त्याचा निकाल होऊं शकत नाहीं,' हे शब्द व अंक.<br>१ ल्या कलमापैकीं रद्द झालेला नसेल तेवढा अंश.<br>[ रद्द करावयाचा मजकूर भाषांतरांत नाहीं. ] |
| १८७४ | १९ | सन १८७४ चा कायद्यांचे स्थानिक व्याप्तीचा आक्ट. | कलम ८, रकम (ऐ). |
| १८७५ | ६ | [ भाषांतर झालें नाहीं. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |
| १८७६ | १० | सन १८७६ चा मुंबईच्या रेव्हिन्यू हुकुमतीचा आक्ट. | उद्देशांतील, 'व सन १८७१ चे जमिनीचे सुधारणुकेचे आक्टाचे तिसरे कलमांत सांगितलेले कारणांखेरीज इतर कारणांसाठीं दिलेल्या तगाई स्थानिक सरकारानें वसूल करण्याबाबद नियम ठरविणें,' हे शब्द व अंक. |
| १८७७ | १४ | [ भाषांतर झालें नाहीं. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |
| १८७८ | १ | सन १८७८ चा अफिणीचा आक्ट. | २ ऱ्या कलमाचा ३ रा पारिग्राफ. |
| १८८४ | ११ | [ भाषांतर झालें नाहीं. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |

# दुसरें परिशिष्ट.

## कायदे सुधारले ते.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | सुधारणा. |
| | | **भाग १.—मुंबई कोडांतील कायदा.** | |
| १८३० | १३ | [ भाषांतर उपलब्ध नाहीं. ] | [ ३रें कोष्टक पाहा. ] |
| | | **भाग २.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा आक्ट.** | |
| १८३९ | २० | हक्कवगैरे घेणें. | कलम ३ यांत, 'तो माणूस वसुलाचा अमलदार असो किंवा नसो तथापि सन १८२७ चे सतरावे कायद्याचे सोळावे कलमांत लिहिलेला गुना त्यास लागेल आणि त्या कलमांत लिहिलेले हुकुमावरून जर त्या माणसावर गुना साबीत होईल तर त्यास सात वर्षेपर्यंत कैद मिळेल आणि घेतले पैक्याचे दसपट दंड पडेल,' या मजकुराच्या बदला, 'तो सरकारच्या वसुलाचा अमलदार असो किंवा नसो, तो पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तसेंच याप्रमाणें घेतलेल्या रकमेच्या दसपटी-हून जास्त नाहीं अशा दंडासही पात्र होईल,' हा मजकूर वाचावा. |

एस्. हार्व्हे. जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.